आप्रवि/नमाक/न.क्र.२०/
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्या.,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
प्लॉट नं.१, तळमजला,धारावी,
माटुंगा,मुंबई-४०० ०१९

**प्रशासकीय परिपत्रक क्र. ०८ दिनांक २-११-०५**

विषय : इंग्रजी निवडश्रेणी लघुलेखक/लघुलेखक/लघुटंकलेखक/टंकलेखक यांना "एतदर्थ मंडळा" ची मराठी लघुलेखनाची/टंकलेखनाची परीक्षा सक्तीची करण्याबाबत.

संदर्भ : १) परिपत्रक क्र. १४ (मभाक), दि.२९.९.९७
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ३७० (मभाक), दिनांक १७ ऑगष्ट २००२.

------

शासनाच्या एतदर्थ मंडळाची मराठी लघुलेखनाची/टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी परिपत्रक क्र.१४ (मभाक), दिनांक २९.९.९७ अन्वये अधिसूचित करण्यात आलेली ४ वर्षांची मुदत प्रशासकीय परिपत्रक क्र.३७० (मभाक), दि. १७.८.२००२ अन्वये आणखी ४ वर्षे वाढवून देण्यात आली. सदर वाढीव मुदत दिनांक २१ सप्टेंबर २००५ रोजी संपुष्टात आली आहे. यास्तव निम्नस्तर लिपिक-नि- टंकलेखक, तसेच इंग्रजी लघुलेखक व टंकलेखक या संवर्गातील किती कर्मचा-यांनी उपरोक्त परीक्षा उत्तीर्ण केली आहे किंवा किती कर्मचा-यांना सदर परीक्षेस बसण्यापासून सूट मिळाली आहे, आणि किती कर्मचारी सदर परीक्षा अद्यापही उत्तीर्ण होण बाकी आहेत यावाबतची माहिती खालील प्रमाणे विहित तक्त्यात दि.१७ नोव्हेंबर २००५ पर्यंत अथवा तत्पूर्वी मराठी भाषा कक्षास पाठवावी.

| कार्यालयाचे नाव | पदाचा प्रवर्ग | एकूण कार्यरत कर्मचारी | परीक्षा उत्तीर्ण झालेले कर्मचारी | परीक्षा उत्तीर्ण न झालेले/परीक्षेस न बसलेले कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

२. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या सर्व परिमंडल कार्यालयांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या परिमंडलाधीन कार्यालयांतील कर्मचा-यांबाबतची संकलित केलेली माहिती दि.१७ नोव्हेंबर २००५ पर्यंत मुख्य कार्यालयास (मराठी भाषा कक्ष) पाठवावी.

३. तसेच मुंबई मुख्य कार्यालयातील सर्व कक्ष प्रमुखांनी त्यांच्या अखत्यारीत कार्यरत असणा-या (इंग्रजी) लघुलेखक/टंकलेखक संवर्गातील कर्मचा-यांबाबतची उपरोक्त माहिती वरील प्रमाणे विहित तक्त्यात सर्व रकाने सुस्पष्टपणे भरून दिनांक १७ नोव्हेंबर २००५ पर्यंत या कक्षास पाठवावी.

(सही) २.११.०५

महा व्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

प्रत :

१)म.रा.वि.वितरण कंपनीच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयातील सर्व कार्यकारी अभियंता व त्यावरील दर्जाचे अधिकारी.

२)निगम कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख